**MHST060007732022**

**संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. २४७/२०२२**

**शासन विरुध्द फिरोज**

## न्यायनिर्णय निशाणी क्र. ८ प्रमाणे

(पारीत दिनांक २८.०३.२०२३)

अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता सौ. एस.एस. कुलकर्णी व आरोपीतर्फे वकील श्री. एम.सी. वसव यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०२. अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपीचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष सिध्द् करतो काय की, दि. २४/०८/२०२२ रोजी १५.०० वाजेचे सुमारास मौजे दहिवडी, ता. माण, जि. सातारा हद्दीत बाजार पटांगण येथील देशी दारुचे दुकानाकडे जाणा-या रस्त्याचे बोळात पत्र्याच्या शेडच्या आडोशास आरोपी हा स्लीप बुकवर कल्याण नावचे मटका जुगारावर लोकांच्याकडून आकडयावर पैसे स्वीकारत असतांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकुण रक्कम रुपये ५२५/-चा मुद्देमाल कब्जात बाळगून मिळून आला ? | **नकारार्थी** |
| २) | काय आदेश ? .................... आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. | |

## **–: का र ण मि मां सा :–**

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

०३. अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप सिध्द् करण्याकरीता केवळ सा.क्र. १ महेश पोपट शिंदे यांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्ष उर्वरित साक्षीदारांची उपस्थिती संपादित करु शकला नाही. त्यामुळे निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबानी निशाणी क्र. ८ लगत नोंदविण्यात आली. त्यामध्ये आरोपीने सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तर देवून खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

०४. प्रस्तूत प्रकरणात सा.क्र. १ महेश पोपट शिंदे हा पंच साक्षीदार असून त्याने त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.२४/०८/२०२२ रोजी पोलीसांनी त्यास दहिवडी येथील बाजार पटांगणाच्या शेजारी असलेल्या देशी दारुच्या दुकानाच्या बोळीत बोलविले व त्या ठिकाणी त्याचे समक्ष आरोपीच्या ताब्यातून एक स्लीप बुक, त्यावर काही अंक नमुद केलेले व नगदी रुपये ५२०/– असा मुद्देमाल जप्त करुन जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ०९) तयार केल्याचे कथन केले आहे. या साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता जप्त केलेले एक स्लीप बुक सारखे पुस्तक बाजारात सहज उपलब्ध होऊ शकत असल्याचे कबुल केले आहे. तसेच, जप्त केलेल्या नगदी रुपयांमधील चलनी नोटा या नवीन छपाई अथवा जुन्या छपाई केलेल्या होत्या हे त्यास सांगता येणार नसल्याचे देखील कबुल केले आहे. त्यामुळे सदरील

साक्षीदाराच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून पोलीसांनी नगदी रुपये ५२०/– जप्त केले असल्यास त्यास नगदी रुपयांमधील चलनी नोटा या नवीन छपाई अथवा जुन्या छपाईच्या आहेत हे त्यास सांगता येणे शक्य होते. परंतू, सदरील साक्षीदाराने त्याबाबत सांगता येणार नसल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे निशाणी ०९ वरील जप्ती पंचनाम्यावर संशय निर्माण होतो.

०५. अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पंच साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता जप्ती पंचनामा कायदेशीररित्या पुर्णपणे सिध्द होऊ शकला नाही. अभियोग पक्षाने दुसरा पंच साक्षीदार, फिर्यादी अगर तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्या अभावी आरोपी हा स्लीप बुकवर कल्याण नावचे मटका जुगारावर लोकांच्याकडून आकडयावर पैसे स्वीकारत असतांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकुण रक्कम रुपये ५२५/– चा मुद्देमाल कब्जात बाळगून मिळून आला असा निष्कर्ष काढण्याकरीता सबळ पुरावा नाही. परिणामी मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते व मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी फिरोज बशीर मुल्ला यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र जुगार अधिनियमाचे कलम १२(अ) या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) फौजदारी पक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) च्या तरतुदींच्या पुर्ततेसाठी आरोपीची जमानत पुढील सहा महिन्यांकरीता वाढविण्यात येत आहे.

३) सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल–आकडेमोड केलेला एक कागदी स्लीप बुक कार्बनच्या तुकडयासह व एक लेक्सी कंपनीचा निळे शाईचा बॉलपेन हे आव्हान कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे. तसेच, जप्त एकूण नगदी रक्कम रुपये ५२०/– हे आव्हान कालावधीनंतर शासनाचे खात्यात जमा करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SHEETAL SHREERAM BAJAJ

Digitally signed by SHEETAL SHREERAM BAJAJ
Date: 2023.03.29 18:09:54 +0530

**(कु. एस.एस. बजाज)**

दिनांक : २८.०३.२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

**-: प्र मा ण प त्र :-**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : ए.एन. ओंबासे,

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी, ता. माण, जि. सातारा.

मा. साहेबांनी चेक केले व पी.डी.एफ. दिनांक : २९/०३/२०२३.

सही/-

लघुलेखकाची सही